# मल्याळी वृत्तवाहिनीवरील सरकारच्या बंदीस काही तासांतच न्यायालयाची स्थगिती

**पीटीआय, तिरुवनंतपूरम**

**मल्याळी वृत्तवाहिनी** मीडिया वन टीव्हीच्या प्रक्षेपणास बंदी घालण्याचा निर्णय सोमवारी माहिती आणि



प्रसारण खात्याने घेतल्यानंतर काही तासांतच केरळ उच्च न्यायालयाने या बंदीस स्थगिती दिली. या वाहिनीस जमात ए इस्लामीचे साह्य मिळत असल्याचे समजते.

उच्च न्यायालयाच्या एकसदस्यीय पीठाने स्थगितीचा निर्णय दिला. मीडिया वन टीव्हीने दाखल केलेल्या याचिकेवर न्या. एन. नागरेश यांनी सरकारच्या निर्णयाला स्थगिती दिली. ही स्थगिती बुधवारी होणाऱ्या पुढील सुनावणीपर्यंत आहे. तसे निर्देश माहिती आणि प्रसारण खात्याकडून जारी करावेत, असे न्यायालयाने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. मनू यांना सांगितले. या वाहिनीला प्रसारण सुविधा पुरविणाऱ्या प्लॅनेटकास्ट मीडिया सर्व्हिसेस लि. कंपनीसही न्यायालयाने नोटीस बजावली आहे.

न्यायालयाकडून दिलासा मिळताच या वाहिनीने आपले प्रक्षेपण लवकरच सुरू करणार असल्याचे घोषित केले.

मल्याळी वृत्तवाहिनी मीडिया वन टीव्हीचे प्रक्षेपण केंद्र सरकारने सोमवारी थांबविले होते. त्याबाबत माहिती आणि प्रसारण खात्याच्या अधिकाऱ्यांनी कोणतीही अधिकृत माहिती दिली नाही. मात्र या वाहिनीने सुरक्षाविषयक परवानग्या मिळविल्या नसल्याने हे पाऊल उचलण्यात आल्याचे याच विभागातील उच्चस्तरीय सूत्रांकडून समजते.

या वाहिनीतील सूत्रांच्या म्हणण्यानुसार, वाहिनीच्या परवान्याची मुदत संपली नसली तरी, परवान्याच्या नूतनीकरणाची प्रक्रिया सुरू असतानाच सरकारने प्रसारणावर बंदी आणली होती.

या वाहिनीला जमात ए इस्लामीचे साह्य मिळत असून सुरक्षेच्या कारणावरून तिच्या प्रक्षेपणावर माहिती आणि प्रसारण खात्याने बंदी आणली होती. सोमवार सायंकाळपासून त्यांचे प्रसारण थांबविण्यात आले होते.

मीडिया वन टीव्हीचे संपादक प्रमोद रामन यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आमच्या वाहिनीवरील बंदी ही सुरक्षिततेच्या कारणावरून घातल्याचे माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे म्हणणे असले तरी त्याबाबत वाहिनाला अद्याप तपशील देण्यात आलेला नाही. या बंदीविरोधात आम्ही कायदेशीर दाद मागण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. ही प्रक्रिया पूर्ण होताच या वाहिनीचे प्रक्षेपण सुरू होऊ शकेल, अशी आशा आहे.



### सुरक्षेचा मुद्दा

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, खासगी वृत्तवाहिनी या वर्गवारीत या वाहिनीच्या परवान्याचे नूतनीकरण करण्यासाठी सुरक्षाविषयक परवानगी देण्यास नकार देण्यात आला आहे. सध्याच्या धोरणानुसार अशी परवानगी ही दहा वर्षांसाठी दिली जाते. या संबंधातील सूचीनुसार या वाहिनीला अपलिंकिंग आणि डाऊनलिंकिंगची परवानगी ही सप्टेंबर २०११ पासून देण्यात आली होती.


**SBI**

स्ट्रॅटेजी आणि डिजिटल बँकिंग विभाग
कॉर्पोरेट सेंटर, मुंबई – ४०००२१

**शुध्दीपत्रक**

कृपया भारतीय स्टेट बँकेच्या 'संचालन अनुषंगिक सहाय्यकाच्या स्थापनेकरिता सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी' दि. ०५.०१.२०२२ रोजीचे आरएफपी क्र. SBI/S & DB/२०२१-२२/OSS/००१ पहावे. दिनांक ३१.०१.२०२२ रोजीचे शुध्दीपत्रक बँकेच्या **https://www.sbi.co.in** या पोर्टलवर पहाता येऊ शकेल.

**स्थळ: मुंबई**
**दिनांक: ०१.०२.२०२२**

**महाव्यवस्थापक (ओएसडी)**
**स्ट्रॅटेजी आणि डिजिटल बँकिंग विभाग**


# ममतांकडून राज्यपाल धनखड 'ब्लॉक'

**पीटीआय, कोलकाता**





**पश्चिम बंगालचे** राज्यपाल जगदीप धनखड हे ट्विटर या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर आपल्या सरकारविरुद्ध नियमितपणे करत असलेल्या पोस्टमुळे 'विचलित' झाल्याने आपण ट्विटरवर त्यांना ब्लॉक केले आहे, असे राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी सांगितले.

धनखड यांनी राज्याचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक यांना अनेकदा धमक्या दिल्या असल्याचा आरोपही बॅनर्जी यांनी केला.

धनखड यांना पदावरून हटवावे, अशी मागणी करणारी पत्रे आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अनेकदा पाठवली आहेत, मात्र आतापर्यंत त्यांनी यावर काही कार्यवाही केलेली नाही, असे मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. ममता बॅनर्जी यांचे राज्यपालांशी कटू संबंध आहेत.

# उत्तर कोरियाकडून महिन्यात सातवी क्षेपणास्त्र चाचणी

**सोल :** उत्तर कोरियाने रविवारी केलेली क्षेपणास्त्र चाचणी ही अमेरिकेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न असल्याचे विश्लेषकांचे मत असून या महिनाभरात उत्तर कोरियाने केलेली ही सातवी क्षेपणास्त्र चाचणी आहे, असे दक्षिण कोरियाचे म्हणणे आहे.

रविवारी उत्तर कोरियाच्या जगांग प्रांतात ही चाचणी झाली. हा भाग चीनलगत आहे. दक्षिण कोरियाचे अध्यक्ष मून जे-ईन यांच्या कार्यालयाने म्हटले आहे की, रविवारी उत्तर कोरियाने चाचणी केलेले हे क्षेपणास्त्र मध्यम पल्ल्याचे असून ही चाचणी म्हणजे संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील ठरावांचे उल्लंघन आहे. दरम्यान, उत्तर कोरियाने सोमवारी या चाचणीची कबुली दिली.

# पश्चिम बंगालमधील शैक्षणिक संस्था गुरुवारपासून सुरू

**कोलकाता : पश्चिम बंगालमधील** करोनाविषयक परिस्थितीत सुधारणा झाल्यामुळे राज्य सरकारने ३ फेब्रुवारीपासून आठवी ते बारावीचे वर्ग पुन्हा सुरू करण्याची शाळांना परवानगी दिली आहे.राज्यातील महाविद्यालये, विद्यापीठे आणि तंत्रनिकेतनही गुरुवारपासून सुरू होतील. प्राथमिक शाळा पुन्हा सुरू करण्याबाबत आम्ही नंतर निर्णय घेऊ, असे मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. राज्यातील करोनाविषयक परिस्थिती बरीच सुधारली असल्यामुळे काही निर्बंध शिथिल करण्यात आले असल्याचे ममता म्हणाल्या.


**SBI**

भारतीय स्टेट बँक, रिटेल अ‍ॅसेट सेंट्रल प्रोसेसिंग सेंटर-१, ४४/२बी, शंकर शेठ रोड, गुलटेक्डी शारदा चेंबर्स जवळ, पुणे ४११०३७. फोन (०२०) २६३०८१७६, ई-मेल racpc.pune@sbi.co.in

**तारण मिळकतीचा ताबा घेतल्याची नोटीस (सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(४)अन्वये)**

नोटीस देण्यात येते की, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल अ‍ॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ (२००२ चा ५४) च्या कलम १३ (१२) व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ मधील नियम ३ आणि नियम ९ अन्वये प्राप्त अधिकारात खाली नमूद केलेल्या कर्जदारांचे समोर दर्शविलेल्या तारखांना **मागणी नोटीस** पाठवून मागणी नोटीस मिळाल्या तारखेपासून ६० दिवसांचे आत बँकेस देणे असलेली संपूर्ण रक्कम भरण्याची मागणी केलेली होती.

कर्जदार मागणी केल्याप्रमाणे भरणा करण्यास असमर्थ ठरले आहेत. सर्वसाधारण जनता व विशेषकरुन कर्जदार यांना ही जाहीर नोटीस देण्यात येते की खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) व सदर नियम क्र. ९ अन्वये खाली नमूद केलेल्या तारखांना तारण मिळकतीचा **प्रतिकात्मक ताबा** घेतलेला आहे.

सर्वसाधारण जनता व विशेषकरुन कर्जदार यांना सावधान करण्यात येत आहे की त्यांनी सदर मिळकतीसंबंधात कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार करु नये. असा व्यवहार केल्यास तो **भारतीय स्टेट बँकेच्या** व्याजासह येणे रकमेच्या बोजासह असेल.

**कर्जदारांचे ध्यान सदर कायद्याच्या कलम १३, उपकलम ८ कडे आकर्षित करण्यात येत असून त्यात कर्जदारास आपल्या तारण मिळकतीवरील बोजा उतरवून घेण्यास उपलब्ध असलेल्या कालमर्यादेची तरतूद आहे.**

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव आणि पत्ता | अचल मिळकतीचा तपशील | मागणी नोटीस तारीख | प्रतिकात्मक ताबा तारीख | रोजी येणे (रु) रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री. शाम बंडू माने (कर्जदार)** **सौ. प्रतिभा शाम माने (सहकर्जदार)** फ्लॅट क्रं.-१०४, पहिला मजला, इमारत क्र. - एल, सन युनिव्हर्स, सर्व्हे क्र. ५१/१/३, ५१/१/४ ते २० नऱ्हे, ता. हवेली, जि. पुणे- ४११०४१. **गृह शाखा- पी बी बी वानवडी** **खाते क्र. ३६२३०६१४७९५** **MC-SBI HL MAXGAIN FEST OFF** | मौजे नऱ्हे, ता. हवेली, जि. पुणे येथील आणि पुणे महानगर पालिका हद्दीतील स. नं. ५१/१/३/१, ५१/१/४ ते २० वरील सन युनिव्हर्स प्रकल्पातील 'एल' इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र.१०४, क्षेत्रफळ ७१.२५ चौ. मि. कार्पेट, म्हणजे ९२.६२ चौ. मि. बिल्टअप आणि टेरेस कार्पेट क्षेत्र १२.३५ चौ. मि. म्हणजे १६.०७ चौ.मि. बिल्टअप एक मोकळे कार पार्किंग. सदर मिळकतीच्या चतु:सीमा दिनांक ०२.०५.२०१६ रोजीच्या विक्री कराराच्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे. | १६.१०.२०२१ **आणि वर्तमानपत्र प्रसिद्ध दिनांक २७.११.२०२१** | २७.०१.२०२२ | **दि. १६.१०.२०२१ रोजी रु. ४३,३४,१३५/- (रु. त्रेचाळीस लाख चौतीस हजार एकशे पस्तीस फक्त)** अधिक पुढील व्याज व आजवर झालेले व भविष्यात होणारे खर्च, आकार इ. |
| २ | **श्री. हिमांशु कुमार (कर्जदार)** **सौ. किरण कुमारी (सह कर्जदार)** फ्लॅट नं. ६१२, ६ वा मजला, बिल्डिंग नंबर- डी, ''द व्हिलेज'', एस. नं.२८८, हिस्सा नं. १+२/२, लोहगाव, ता. हवेली, जि. पुणे- ४११०४७. **गृह शाखा- एरंडवणा** **खाते क्र ३२३९०३४४३०२** **SBI H L Maxgain** **खाते क्र. ३२३९५४१७०२८** **सुरक्षा** | लोहगाव, ता. हवेली, जि. पुणे येथील स. नं. २८८, हिस्सा नं. १+२/२ वरील 'द व्हिलेज' नावाच्या प्रकल्पातील 'डी' इमारतीमधील सहाव्या मजल्या वरील फ्लॅट क्र. ६१२, कार्पेट क्षेत्रफळ ४०.६९ चौ. मि. सदर मिळकतीच्या चतु:सीमा दिनांक १८.०४.२०१२ च्या विक्री करारातील परिशिष्टात नमूद केल्यानुसार. | १६.१०.२०२१ **आणि वर्तमानपत्र प्रसिद्ध दिनांक २७.११.२०२१** | २७.०१.२०२२ | **दि. १४.१०.२०२१ रोजी रु. ११,५८,९२५/- (रु. अकरा लाख अठ्ठावन्न हजार नऊशे पंचवीस फक्त)** अधिक पुढील व्याज व आजवर झालेले व भविष्यात होणारे खर्च आकार इ. |

दिनांक : ०१.०२.२०२२
स्थळ : पुणे

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

सही/-
अधिकृत अधिकारी,
भारतीय स्टेट बँक, आरएसीपीसी १, पुणे



हिन्दुस्तान पेट्रोलियम

# हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
## HINDUSTAN PETROLEUM CORPORATION LIMITED
(महारत्न कंपनी)

नोंदणीकृत कार्यालय : १७, जमशेदजी टाटा रोड, मुंबई - ४०० ०२०
संकेतस्थळ : www.hindustanpetroleum.com, ईमेल : corphqo@hpcl.in, सीआईएन नं.:L23201MH1952GOI008858

आज़ादी का अमृत महोत्सव

**३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महीन्यांकरीता स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा गोषवारा**

(₹ करोडमध्ये)

| तपशील | स्वतंत्र निष्कर्ष | | | | | एकत्रित निष्कर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संपलेली तिमाही | | संपलेले नऊ महिने | | संपलेले वर्ष | संपलेली तिमाही | | संपलेले नऊ महिने | | संपलेले वर्ष |
| | ३१.१२.२०२१ | ३१.१२.२०२० | ३१.१२.२०२१ | ३१.१२.२०२० | ३१.०३.२०२१ | ३१.१२.२०२१ | ३१.१२.२०२० | ३१.१२.२०२१ | ३१.१२.२०२० | ३१.०३.२०२१ |
| | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| प्रचलनाचे एकूण उत्पन्न | १,०३,४२२.३७ | ७७,४१२.६८ | २,६८,६०८.२६ | १,८५,१२२.७७ | २,७०,३२६.३२ | १,०३,४८८.७५ | ७७,४८२.८५ | २,६८,७७६.५० | १,८५,३१३.१९ | २,७०,५७७.९६ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबीपूर्वी) | १,१६०.६६ | ३,१५७.८७ | ५,९१८.७५ | १०,१७८.२८ | १४,२४६.७९ | १,६२९.४१ | ३,१६९.५९ | ६,६४०.४० | १०,१२७.२५ | १४,१९७.०० |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | १,१६०.६६ | ३,१५७.८७ | ५,९१८.७५ | १०,१७८.२८ | १४,२४६.७९ | १,६२९.४१ | ३,१६९.५९ | ६,६४०.४० | १०,१२७.२५ | १४,१९७.०० |
| कालावधीसाठी करपश्चात निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ८६८.८६ | २,३५४.६४ | ४,५८७.३७ | ७,६४५.९२ | १०,६६३.८८ | १,३५२.९९ | २,३७३.७१ | ५,२७५.७८ | ७,६०२.१९ | १०,६६२.८९ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न [कालावधीसाठी अंतर्भूत केलेला नफा / (तोटा) (करपश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात)] | ६७७.३७ | २,३९७.६१ | ४,७८२.३४ | ७,६६२.३६ | १०,६७७.६९ | १,१६६.६८ | २,४५१.११ | ५,४४६.९२ | ७,७२९.३५ | १०,८१६.३२ |
| राखीव (पूर्नमुल्यांकन राखीव वगळून) | | | | | ३४,७३३.७० | | | | | ३६,६२८.४५ |
| भरणा केलेले समभाग भाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १०/- प्रत्येकी) | १,४१८.५५ | १,४९८.६३ | १,४१८.५५ | १,४९८.६३ | १,४५२.०२ | १,४१८.५५ | १,४९८.६३ | १,४१८.५५ | १,४९८.६३ | १,४५२.०२ |
| पायाभूत व सौमिकृत प्रति शेअर कमाई (₹ १०/- प्रत्येकी) (वार्षिकीकृत न केलेले) | ६.१२ | १५.५१ | ३२.२९ | ५०.२४ | ७०.५७ | ९.५४ | १५.६३ | ३७.१३ | ४९.९५ | ७०.५७ |
| निव्वळ मूल्य | ३६,७७४.५२ | ३४,५३९.१४ | ३६,७७४.५२ | ३४,५३९.१४ | ३६,१८६.११ | ३९,३३३.८४ | ३६,६२४.३८ | ३९,३३३.८४ | ३६,६२४.३८ | ३८,०८०.८६ |
| थकीत कर्ज | ३७,२४९.७३ | ३०,६३९.४० | ३७,२४९.७३ | ३०,६३९.४० | ४०,००८.९१ | ३८,७०४.१९ | ३१,२८९.३४ | ३८,७०४.१९ | ३१,२८९.३४ | ४०,६८३.८४ |
| भांडवल विमोचन राखीव | १०५.२७ | २५.२० | १०५.२७ | २५.२० | ७१.८० | १०६.८३ | २६.७६ | १०६.८३ | २६.७६ | ७३.३६ |
| ऋणपत्र विमोचन राखीव | ६२५.०० | ६२५.०० | ६२५.०० | ६२५.०० | ६२५.०० | ७५४.५१ | ७५१.२४ | ७५४.५१ | ७५१.२४ | ७५३.९७ |
| ऋण समभाग गुणोत्तर (गुना) | ०.८२ | ०.७९ | ०.८२ | ०.७९ | ०.७० | ०.७८ | ०.७६ | ०.७८ | ०.७६ | ०.६८ |
| ऋण सेवा व्याप्ती गुणोत्तर (गुना) | ६.२८ | २८.६५ | ८.४४ | १७.९५ | ३.६५ | ७.३८ | २७.७७ | ८.९९ | १३.१६ | ३.४७ |
| व्याज सेवा व्याप्ती गुणोत्तर (गुना) | १०.२७ | ३२.७० | १४.६६ | १९.०३ | २०.४६ | ११.९२ | ३१.७२ | १५.४३ | १८.३१ | १९.५० |

नोंदी :

१) वरील माहिती ही सेबी (सूचीकरण आणि इतर प्रगटीकरणाच्या आवश्यकता) नियमन २०१५ मधील नियमन ३३ आणि ५२ अन्वये स्टॉक एक्स्चेंजकडे सादर करण्यात आलेल्या तिमाहीच्या वित्तीय निष्कर्षांचा सविस्तर फॉरमॅटचा गोषवारा आहे. तिमाहीच्या वित्तीय निष्कर्षांचा संपूर्ण स्वरूपातील वित्तीय निष्कर्ष कंपनीच्या वेबपेज (https://www.hindustanpetroleum.com/financial) आणि स्टॉक एक्स्चेंजच्या (www.bseindia.com आणि www.nseindia.com) या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.

२) मागील काळातील आकडेवारी आवश्यक तेथे पुनर्गटीकरण /पुनवर्गीकरण करण्यात आलेली आहे.

स्थळ : मुंबई
दिनांक : ३१ जानेवारी, २०२२

/hpcl | /hpcl | /hpcl
www.hindustanpetroleum.com
Wear reusable face cover or mask
Wash hands frequently and thoroughly
2 Gaj ki Doori (6 feet)
Maintain Physical Distance

मंडळाच्या आदेशानुसार
हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
सही/-
मुकेश कुमार सुराणा
अध्यक्ष आणि व्यवस्थापकिय संचालक
डिआयएन - ०७४६४६७५



**मत्तांची ऑनलाईन ई-लिलाव विक्री**

kotak
Kotak Mahindra Bank

**कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** 27 बीकेसी, सी 27, जी-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रे (पु), मुंबई, महाराष्ट्र, पिन कोड-400051
**शाखा कार्यालय:** कोटक महिंद्रा बँक लि. झोन-2, न्याती युनीट्री, चौथा मजला, येरवडा, पुणे-नगर हायवे, पुणे-411006

**अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) सह वाचण्यात येणाऱ्या नियम 8(5) अंतर्गत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे कर्जदार व जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनको कडे तारण/भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तेचा 'स्मॉल बिजनेस फिन क्रेडीट इंडिया प्रा. लि.' (एसबीएफसी) द्वारे त्यांचे नावे कर्जाचे अभिहस्तांकन करण्यात आल्यानंतर कोटक महिंद्रा बँक लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दि.18.11.2011 रोजी प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून तिची सुरक्षित धनको कोटक महिंद्रा बँक लि. यांना कर्ज खाते क्र. PR00401787 आणि PR00411236 अंतर्गत **श्री शमसुझ्झका अमरुलहसन खान आणि साजरा खान** यांचेकडून दि. 25/01/2022 नुसार घेणे असलेल्या रु. 27,23,005.12/- (रुपये सत्तावीस लक्ष तेवीस हजार पाच आणि बारा पैसे फक्त) अधिक वसुलीच्या दिनांकापर्यंतच लागू दराने पुढील व्याज एवढ्या रकमेच्या वसुलीसाठी दि. 10-03-2022 रोजी दु. 12.00 ते 1.00 वाजेपर्यंत प्रत्येकी पाच मिनिटांच्या अमर्याद कालविस्तारासह वाजेपर्यंत 'जशी आहे जेथे आहे', 'जशी आहे जे काही आहे' आणि 'तेथे जे काही आहे' तत्वावर विक्री करण्यात येईल.

**आरक्षित किंमत** रु. 15,00,000/- (रुपये पंधरा लक्ष फक्त) आणि **बयाणा रक्कम** रु. 1,50,,000/- (रुपये एक लक्ष पन्नास हजार फक्त) असेल आणि केवायसीसह बयाणा रक्कम सादर करण्याचा शेवटचा दिनांक आहे 09-03-2022 रोजी सायं. 6.00 वा. (भाप्रवे)

**मालमत्तेचे वर्णन:** सदनिका क्र. 21, क्षेत्रफळ सुमारे 535 चौ.फू. बिल्ट-अप, पहिला मजला, विंग बी,शिल्पलेखा को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., के.जी. हाईट्स, स.क्र. 31, हिस्सा क्र. 1/1, धनकवडी, पुणे, उप-निबंधक तालुका हवेली, जिल्हा पुणे आणि पुणे महानगर पालिकेच्या अधिकार-क्षेत्रात.

सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदाराचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग 8 कडे वेधण्यात येते. कर्जदार व सर्व लोकांनी कृपया लक्षात घ्यावे की येथे नियोजित लिलाव कुठल्याही कारणास्तव अयशस्वी ठरल्यास सुरक्षित धनको खाजगी कराराच्या माध्यमातून विक्रीद्वारे सुरक्षा हिताची अंमलबजावणी करतील. विक्रीसाठी काढण्यात आलेल्या मत्तेशी संबंधित खुलासा/चौकशीसाठी बोलीदारांनी यांचेशी संपर्क साधावा:, श्री राजेंदर दहिया (+91 8448264515), श्री गुलाल सिंग (+91 9592921114), श्री निलेश एस देसाई (+919822501623).

विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया कोटक महिंद्रा बँकची वेबसाईट म्हणजे https://www.kotak.com येथे दिलेली लिंक https://www.kotak.com/en/bank-auctions.html आणि/किंवा https://bankauctions.in/ पहावे.

**स्थान:** पुणे, **दिनांक:** 01-02-2022 — **प्राधिकृत अधिकारी,** कोटक महिंद्रा बँक लिमिटेड



यूनियन बैंक ऑफ इंडिया | Union Bank of India
आन्ध्रा Andhra | कार्पोरेशन Corporation

**क्षेत्रिय कार्यालय पुणे-पश्चिम :**
शॉप नं. २०१ व २०२, स्टेलार एन्क्लेव्ह, डी.पी. रोड, परीहार चौकाजवळ, औंध, पुणे-४११००७.

**स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**ई-ऑक्शन विक्री सूचना महा ई-ऑक्शन**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इन्टरेस्ट ॲक्ट,२००२, त्यासह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटी इन्टरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील रूल ८(६) अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-ऑक्शन विक्री सूचना**

यानुसार सर्वसाधारण जनतेस आणि विशेषत: कर्जदारांस आणि जामीनदारांस सूचना देण्यात येते की, पुढे नमूद करण्यात आलेल्या स्थावर मालमत्ता, ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण/ताब्यात असून, युनियन बँक ऑफ इंडिया, (सुरक्षित धनको) यांचे अधिकृत अधिकारी यांनी सदर मालमत्तांचा विधायक/प्रत्यक्ष ताबा (जसे लागू असेल त्याप्रमाणे) घेतला असून सदर मालमत्तांची **''जसे आहे, जेथे आहे''**, **''जे आहे, जसे आहे''** आणि **''तेथे जे आहे''** तत्वावर खाली नमूद केलेल्या परिशिष्टानुसार विक्री करण्यात येणार आहे-

| अ. क्र. | खातेधारकाचे नाव | मालमत्तेचा तपशील | राखीव किंमत व बयाणा रक्कम | एनपीएच्या तारखेअखेर येणे रक्कम व त्यावरील व्याज | शाखेचे नाव व प्रबंधकाचा संपर्क क्र. व खात्याचे तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री. स्वप्निल मनोहर म्हात्रे आणि सौ. शीतल स्वप्निल म्हात्रे** | फ्लॅट नं. बी-१०२, १ ला मजला, बी बिल्डींग, ऐश्वर्यम कोर्टयार्ड रोड, फेज-२, गट नं. ११६९, ११७०, ११७१, ११७२ आणि १२४१, नेवले वस्तीजवळ, चिखली, तालुका हवेली, जिल्हा पुणे-४११०६२ (बांधकाम क्षेत्रफळ ९४१ चौ.फू.) | **राखीव किंमत :** रु. ४६,६०,०००/- **बयाणा :** ४,६६,०००/- | रु. ३७,४४,०३३/- | खाते क्र.: २६१०११९८००५०००० आयएफएससी: UBIN0826103 चाकण शाखा (पूनम भास्कर, ८६०७९५००११) |
| २ | **सी.एम. बायो अ‍ॅग्रो प्रोसेसिंग प्रा.लि. (चंद्रकांत रामचंद्र मोरे)** | एनए जमीनचा सर्वसामाईक भाग, सुपर स्ट्रक्चर, गट नं. २०० वर बांधण्यात आलेली, शिवानी फाटा, मु.पो. येवलेवाडी, ता. कडेगांव, जि. सांगली-४१५३०५ येथे. क्षेत्रफळ ६३५० चौ.मी. | **राखीव किंमत :** रु. २,३९,३०,०००/- **बयाणा :** २३,९३,०००/- | रु. ३,६०,४७,४३०/- | खाते क्र.: १२७९२१९८००५०००० आयएफएससी: UBIN0912794 कराड शाखा (e-cb)(अमरिश रजपूत, ७०५७५०४९९४) |
| ३ | **सौ. अनघा सुनिल जगताप आणि श्री. सुनिल श्रीराम जगताप** | फ्लॅट नं. १, स्टील्ट मजला, श्रीप्रताप रेसिडेन्सी, शिवाजी पार्क, संभाजी नगर, सेक्टर १८, प्लॉट नं. २३९, प्राधिकरण क्षेत्र (पीसीएनटीडीए), चिखली, तालुका हवेली, जि. पुणे-४११०४४. एकूण फ्लॅटचे क्षेत्रफळ १३०.११चौ.मी. | **राखीव किंमत :** रु. ७०,१७,०००/- **बयाणा :** ७,०१,७००/- | रु. २७,८७,५१२/- | खाते क्र.: १६७५२१९८००५०००० आयएफएससी: UBIN0916757 पुणे-निगडी (e-cb) शाखा (श्री. व्यंकटेश कापसे, ९९७५६४४५५४) |
| ४ | **श्री. बालाजी अंगदराव देवरगावे आणि सौ. ऐश्वर्या बालाजी देवरगावे** | फ्लॅट नं. ३०४, ३ रा मजला, लोटस तीर्थ, फारुंदा हॉटेलसमोर, मोरवाडी, पिंपरी, सीटीएस नं. ५८२० (भाग), ५८२२, ५८२३(भाग), ५८३३ (भाग), सर्व्हे नं. ३६, हिस्सा नं. १३, मौजे पिंपरी वाघेरे, पुणे-४११०१८. फ्लॅटचे एकूण क्षेत्रफळ ६६० चौ.फू. | **राखीव किंमत :** रु. ४२,२६,०००/- **बयाणा :** ४,२२,६००/- | रु. १२,९७,५३८/- | खाते क्र.: १६७५२१९८००५०००० आयएफएससी: UBIN0916757 पुणे-निगडी (e-cb) शाखा (श्री. व्यंकटेश कापसे, ९९७५६४४५५४) |

- **ई-ऑक्शनची तारीख : दि. १०/०३/२०२२, स. ११.०० ते सायं. ५.००** दरम्यान. **बयाणा रक्कम सादर करावयाची अंतिम तारीख :** ई-ऑक्शन सुरू होण्यापूर्वी बयाणा रक्कम फक्त एमएसटीसी द्वारे भरणे आवश्यक आहे. **जर काही बोजा असेल तर –** माहिती नाही.
- इन्कम टॅक्स अ‍ॅक्ट १९६१, सेक्शन १९४-आयए अंतर्गत रु. ५०.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त जमा करण्यात येणाऱ्या रक्कमेवर १% प्रमाणे टीडीएस् भरण्याची यशस्वी प्रस्तावकाची जबाबदारी असेल. यशस्वी प्रस्तावक किंवा खरेदीदाराने विक्री किंमतीच्या १% टीडीएस इन्कम टॅक्स विभागाचा फॉर्म नं. १६-बी, ज्यामध्ये विक्रीकर्त्याचा PAN नं. असेल, तो भरून इन्कम टॅक्स विभागाकडे दाखल करावा व टीडीएस् प्रमाणपत्राची मूळ पावती बँकेकडे सादर करावी. खरेदीदाराने सर्व स्थानिक कर, उत्पादन शुल्क आणि इतर सर्व वैधानिक देणी भरणे बंधनकारक आहे. विक्री प्रक्रियेसाठी जारी करण्यात आलेल्या कागदपत्रांसाठीची नोंदणी रक्कम आणि मुद्रांक शुल्क हे सर्व खरेदीदाराने भरावयाचे आहे.

विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्ती पाहण्यासाठी कृपया युनियन बँक ऑफ इंडिया, सुरक्षित धनकोच्या वेबसाईट वरील लिंक म्हणजेच **https://www.unionbankofindia.co.in//english/TenderViewAllAuction.aspx, www.unionbankofindia.co.in, https://ibapi.in** वर संपर्क साधू शकतात. ई-ऑक्शन विक्री प्रक्रिया फक्त एमएसटीसी मार्फत करण्यात येईल.

दिनांक : २९/०१/२०२२
स्थळ : पुणे

अधिकृत अधिकारी,
युनियन बँक ऑफ इंडिया